उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्रात भाजपाचे नेते असून तेच राज्याचं नेतृत्त्व करतील, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज नागपूर विमानतळावर बातमीदारांशी बोलत होते. सरकारमध्येच राहून संघटनेला मदत करण्याची विनंती भाजपाच्या सर्व आमदारांनी आणि पक्ष सदस्यांनी देवेंद्र फडणवीस यांना केली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. केंद्र सरकारनं महाराष्ट्रासाठी आखलेल्या सर्व योजनांची माहिती जनतेपर्यंत पोचवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. लोकसभेच्या निवडणुकीत जनतेने दिलेल्या पाठिंब्यासाठी भाजपा महाराष्ट्रात धन्यवाद यात्रा काढणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात नारायण राणे यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करत विजय मिळवला आहे, असा आरोप करत त्यांची निवड रद्द करण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे नोटीशीद्वारे केली आहे. राणे यांना पाच वर्षांसाठी निवडणूक लढवायला आणि मतदान करायला बंदी घालावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तिसरी जागतिक हॅकेथॉन "HaRBinger 2024" चं आयोजित केली असून आज याच्या नोंदणीचा शेवटचा दिवस आहे. इच्छुकांनी नोंदणी आणि त्यांचे प्रस्ताव https://app.apixplatform.com/h1/harbinger2024 या संकेतस्थळावर नोंदवावेत असं आवाहन आरबीआयनं केलं आहे.

आर्थिक फसवणूक टाळण्याचे विविध उपाय, टोकनवर आधारित व्यवहारात सुलभीकरण आणत ते अधिक सुरक्षित करणं, कोणतेही व्यवहार होत नसलेली बँक खाती ओळखणं आणि खराब झालेल्या नोटा अचूकपणं ओळखणं अशा विविध गोष्टींसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या प्रस्तावांना आरबीआयनं आयोजित केलेल्या HaRBinger २०२४ या हॅकेथॉनमध्ये निमंत्रित केलं आहे. आज या हॅकेथॉन नोंदणीचा शेवटचा दिवस असून यात १८ वर्षे आणि त्यावरील व्यक्ती अथवा समूह सहभागी होऊ शकतात.

**<><><><><>**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - मिफचा आज पाचवा दिवस आहे. मिफमध्ये आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतले माहितीपट, तसंच शॉर्ट फिक्शन, बेलारूस, रशिया आणि फ्रान्स या देशांचे, तसंच ऑस्करसाठी निवडले गेलेले चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. आशियाई महिलांचे विशेष चित्रपट, दिव्यांगजनांसाठी तयार केलेले विशेष चित्रपटही पाहता येणार आहेत. याशिवाय लघुपट, ॲनिमेशन, माहितीपट, वेबसीरीज आणि ओटीटी मंच या विषयांवरची चर्चासत्रं, परिसंवाद आणि मार्गदर्शन सत्रंही होणार आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे परीक्षक आज वार्ताहरांशी संवाद साधतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहार मधल्या नालंदा विद्यापीठात प्रदूषण विरहीत हरित आवाराचं उद्घाटन केलं. ८०० वर्षांनंतर या विद्यापीठाला पुन्हा वैभव प्राप्त झाल्याचं यावेळी प्रधानमंत्री म्हणाले. ४५५ एकर परिसरात तयार झालेल्या या परिसरात २४ इमारती आणि साडेचारशे विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय आहे. कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी नालंदा विद्यापीठातल्या भग्नावशेषांची पाहणी केली.

तसंच परिसरात वृक्षारोपणही केलं. बिहारचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री नीतिशकुमार यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

आदिवासी समुदायाचं भारतीय अर्थव्यवस्थेत मोठं योगदान असून आदिवासी आपली ओळख आहेत, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. मध्यप्रदेशातल्या दिंडोरी इथं जागतिक सिकल सेल निर्मूलन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. सिकलसेल आजाराचं निर्मूलन करण्यासाठी सरकार वचनबद्ध असून २०४७ मध्ये भारत पूर्णपणे सिकलसेलमुक्त होईल, असा विश्वास उपराष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला.

<><><><><>

येत्या २१ जूनला साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचं औचित्य साधत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमावर शशांकासन करतानाचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये हे आसन कसे करायचे हे सांगत त्याचे फायदे सांगितले आहेत. हे आसन केल्यामुळे पाठदुखीची समस्या कमी होते. तसंच हे आसन केल्यामुळे ताण, राग कमी होण्यास मदत होते.

<><><><><>

आयसीसी टी ट्वेंटी  विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आजपासून सुपर आठ संघांमधले सामने सुरू होणार आहेत. हे सर्व सामने वेस्ट इंडिज मध्ये खेळले जाणार आहे. यातला पहिला सामना आज अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांदरम्यान खेळला जाणार आहे. सुपर आठ फेरीतला भारताचा पहिला सामना उद्या अफगाणिस्तान बरोबर होणार आहे. बांगलादेशने सर्वात शेवटी नेपाळवर विजय मिळवून सुपर आठ मधे प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यानच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज  बंगळुरु इथं सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकली असून पहिल्यांदा क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २२ षटकात एका गड्याच्या मोबदल्यात ९६ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//